महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 93 /२०२४ दि. 24/०१/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**संदर्भ :–** १) जा.क्र. पोउपआ/वाह/नवी मुंबई/१४२/२०२४, दि. २३/०१/२०२४.

*******

**ज्याअर्थी,** मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने श्री. मनोज जरांगे पाटील यांनी दिनांक २०/०१/२०२४ रोजी पासून जालना ते मुंबई पायी पदयात्रा सुरू केलेली आहे. सदर पदयात्रे सोबत दुचाकी, चारचाकी वाहनांचा ताफा मोठया प्रमाणात नवी मुंबई येथून मुंबई कडे जाणार आहे. दिनांक २५/०१/२०२४ रोजी नवी मुंबई येथे पदयात्रेचा एक दिवस मुक्काम असणार आहे.

**ज्याअर्थी,** गुजरात, मुंबई, मिरा भाईंदर, घोडबंदर रोड मार्गे तसेच नाशिक, भिवंडी येथून ठाणे मार्गे नवी मुंबई कडे जाणाऱ्या जड, अवजड वाहनांची वर्दळ मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने नमुद मार्गावर जड अवजड वाहनांची वाहतुक सुरू राहिल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होवू शकतो. याकरीता वरील संदर्भ क्र. ०१ अन्वये जड अवजड वाहनांची वाहतूक ठराविक दिनांक व वेळेकरीता बंद करण्यात आलेली आहे.

**ज्याअर्थी,** ठाणे शहर कडून नवी मुंबई कडे जड अवजड वाहने मार्गस्थ होवून वाहतूक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरीता सदर परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर,** महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** ठाणे शहर कडून नवी मुंबई कडे जाणा–या सर्व प्रकारच्या जड अवजड मालवाहतूक करणा–या वाहनांना ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे सर्व शहरांचे मार्गावरून मार्गस्थ होण्यास प्रवेश बंद करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २५/०१/२०२४ रोजी ००:०१ वा. ते दिनांक २६/०१/२०२४ रोजी २४:०० वाजेपावेतो लागू राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**
संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.
२/— आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना जारी केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत मा. सविनय सादर**
जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा—भाईंदर वसई—विरार.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**
पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा—भाईंदर वसई—विरार.
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१ ठाणे, परिमंडळ—२ भिवंडी, परिमंडळ—३ कल्याण, परिमंडळ—४ उल्हासनगर, परिमंडळ—५ वागळे इस्टेट.

**प्रत** :— आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत** :— मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत** :— स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/— सदर अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CamScanner